# शापविमोचन

गो. ना. (तथा) गोविंद नारायण दातारशास्त्री

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**शापविमोचन : गोविंद नारायण दातारशास्त्री**

**© सुरक्षित**

समन्वय प्रकाशन
६७८ ई वॉर्ड, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
मे, २०१२

**किंमत**
रुपये ४००/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## प्रस्तावना

# शापविमोचन

प्रसिद्ध इंग्रज कांदबरीकार रेनाल्डस् याच्या ‘नेक्रोमान्सर’ या कादंबरीच्या आधारे आम्ही प्रस्तुत कथानक लिहिलेले आहे. मूळ पुस्तकात अद्‌भुत व अलौकिक गोष्टी बऱ्याच असल्यामुळे आम्ही या कादंबरीस पौराणिक स्वरूप दिले आहे. गंधर्व, अप्सरा, यक्ष, किन्नर इत्यादी देवयोनींतील व्यक्तीस शापामुळे मनुष्यजन्म घ्यावे लागतात, अशा गोष्टी पुराणांमध्ये वारंवार ऐकू येतात. अशाच स्वरूपाच्या एका गोष्टीवर या कादंबरीची रचना केलेली आहे. शापासारख्या अलौकिक गोष्टीस जसा पौराणिक काल अनुकूल आहे. तसा तो प्रीति-विवाह, अनमोल किंवा प्रतिलोम विवाह वगैरे गोष्टीस अनुकूल आहे, ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत असेलच.

व्यसनाधीन मनुष्य किती परतंत्र आणि विवेकशून्य होतो, हे या कादंबरीमध्ये जितक्या मौजेने दाखवले आहे, तितक्या मौजेने ते दुसऱ्या थोड्याच कादंबऱ्यांत दाखवलेले दृष्टीस पडेल, असे म्हणावयास हरकत नाही. व्यसनाधीन पुरुष स्वभावत:च लोकांच्या करमणुकीचा विषय झालेला असतो. त्याच्या बालीश चेष्टा निसर्गत: मरनोरंजक असतात. व्यसनी पुरुषांना आपले व्यसन आपल्यापुरतेच ठेवून मजा वाटत नाहीं. एका व्यसनी पुरुषाच्या मूर्खपणाचा फायदा घेण्यासाठी दुसरे हांजीखोर आणि आपमतलबी व्यसनी त्याजपाशी जमतात, आणि त्याच्या संपत्तीवर आपली चैन चालवतात. इतकेच नव्हे तर प्रसंगविशेषी ते त्याच्या नाशास कारणीभूत होता. दोन व्यसनी एकत्र आले म्हणजे ‘आधीच मर्कट तशांतही मद्य प्याला’ अशातला प्रकार होतो व ‘अहोरूपमहो ध्वनि:’ या न्यायाने व्यसनाच्या व व्यसनी लोकांच्या प्रशंसेचा प्रवाह सुरू होतो. हा सर्व प्रकार या कादंबरीत दाखवला आहे.

ज्यांच्याजवळ मानसिक धैर्याचा अभाव असतो, त्यांचे वर्तन दुटप्पी किंवा धरसोडीचे असते. तसल्या माणसांचे दुटप्पी वर्तनाखेरीज चालतच नाही. मानसिक धैर्य नसल्यामुळे त्यांना स्वत्वाचे रक्षण करण्याचे सामर्थ्य असत नाही, आणि बिकट परिस्थितीमुळे अथवा दुष्प्राप्य महत्त्वाकांक्षेला बळी पडल्यामुळे त्यांना जीवनकलह असह्य होतो. अशा प्रसंगी त्यांना दुटप्पी वर्तन ठेवण्यावाचून गत्यंतर नसतें. माणसांचे वर्तन दुटप्पी असणे हे योग्य नाहीं. ही गोष्ट समजत असूनही दुर्बळ मनाचे पुष्कळ लोक तोच मार्ग धरतात. इतकेच नव्हे, तर आपण धरलेला मार्गच खरा असून शास्त्रसंमत आहे असें जोरांने प्रतिपादीत असतात. प्रस्तुत कथानकात असले दुटप्पी वर्तन करणाऱ्या पात्रांचे स्वभाव आपोआपच मनोरंजक बनले आहेत.

मनुष्याची पापाकडे प्रवृत्ती करणाऱ्या मनोविकारांत लोभाइतकाच द्वेष हाही एक मोठा प्रबल मनोविकार आहे. तो मानवी जातीचा शत्रू आहे. ज्याच्या अंत:करणात द्वेषाचे बी रुजले, त्याचे सर्व जीवित द्वेषमय होते आणि ज्याच्या मनात सारासार विचारांस थारा मिळत नाहीं, द्वेष साधण्याच्या एका प्रबल भावनेपुढे इतर भावना लोपून जातात, आणि त्या पुरुषाला पुण्यमार्गापेक्षा पापमार्गच अधिक आवडू लागतात. आपण पाप करीत आहोत, हे समजत असूनही द्वेषबुद्धी मनात बाणलेली माणसें पापकर्मास प्रवृत्त होतात. या पापकर्माची मजल कोठपर्यंत जाईल याचा नेम नसतो. मांजर जसें डोळे मिटून दूध पीत असते, आणि 'आपले हे कृत्य जगाला दिसत नाही,' असे आपल्या मनात समजत असते, तशी द्वेषबुद्धीने पापकर्म करणारांची अवस्था असते. आपल्या मते ते आपली घोर कृत्ये चोरून करत असतात, पण केव्हांना केव्हां तरी ती चव्हाट्यावर येतात, आणि या घोर कृत्यांचा परिणाम दुसऱ्याला भोगावा न लागता ज्याचा त्यालाच भोगावा लागतो. क्षुद्रबुद्धीने द्वेषाच्या भरीस पडून दुष्कृत्यांस प्रवृत्त होणारी आणि शेवटी फजित होणारी पात्रेही या कादंबरीत दृष्टीस पडतील.

अंगामध्ये अलौकिक सामर्थ्य असले म्हणजे आपणास सुख होईल, अशा कल्पनेने जगातील कित्येक माणसे तळमळत असतात. अलौकिक चमत्कार किंवा अद्‌भुत गोष्टी, श्रद्धा ठेवण्यास योग्य आहेत किंवा नाहीत, हा विचार करण्याचे येथे कारण नाही. जर कदाचित दैवयोगाने एखाद्या व्यक्तीला अद्‌भुत चमत्कार करण्याचे अलौकिक सामर्थ्य प्राप्त झाले, तर त्यापासून त्याला सुख होईलच असे म्हणता

येणार नाही. अपार संपत्ती किंवा अलौकिक सामर्थ्य, हेच काही इहलोकाच्या सुखाचे खरे साधन नव्हे, हे प्रस्तुत कादंबरीतील एकदोन पात्रांच्या हकीकतीवरून वाचकांच्या लक्षात येईल.

इंदुप्रकाश आणि श्री सयाजीविजय या दोन पत्रात ज्या आमच्या कादंबऱ्या आजपर्यंत प्रसिद्ध झाल्या, त्यातील ही सातवी कादंबरी होय. पूर्वीच्या आमच्या कृतींप्रमाणे हीही वाचकांस मान्य होईल अशी आम्हांस उमेद आहे. या कृतीत दोष पुष्कळ असतील; पण ते लक्षात न घेता जर कोठे काही गुण आढळले तर तेवढ्याकडे लक्ष देऊन ही आमची सेवा मान्य करून घ्यावी, अशी विनंती करून ही प्रस्तावना येथे पूर्ण करतो.

**– गो. ना. दातार**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | कथा प्रवेश | ............... | ९ |
| १) | जयंती | ............... | २२ |
| २) | परशुधर | ............... | २८ |
| ३) | परशुधर आणि जयंती | ............... | ३८ |
| ४) | प्रियव्रताच्या वाड्यात | ............... | ४५ |
| ५) | एक वृद्ध गोसावी | ............... | ४९ |
| ६) | आजा आणि जयंती | ............... | ५८ |
| ७) | वृद्ध गोसाव्याचे पूर्ववृत्त | ............... | ६४ |
| ८) | राजाची वचने | ............... | ७५ |
| ९) | दोन घोडेस्वार | ............... | ८१ |
| १०) | तडजोड | ............... | ८८ |
| ११) | घोडेवाल्याची भेट | ............... | ९६ |
| १२) | रोमकंठ-खासगी कारभारी | ............... | १०५ |
| १३) | नगरशेट चंदनदास | ............... | ११२ |
| १४) | बागेमध्ये | ............... | ११९ |
| १५) | प्रवास | ............... | १३१ |
| १६) | जयंती आणि आनंदी | ............... | १४० |
| १७) | राजाच्या युक्त्या | ............... | १५० |
| १८) | बागेतली सहल | ............... | १५८ |
| १९) | पुन्हा परशुधर आणि जयंती | ............... | १६८ |
| २०) | जयंतीच्या पत्राचा परिणाम | ............... | १७५ |
| २१) | हिऱ्यांची खरेदी | ............... | १८२ |
| २२) | भामिनीचे पूर्ववृत्त | ............... | १८७ |
| २३) | चंदनदास आणि जयंती | ............... | २१३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २४) | परशुधराचे पुनरागमन | ............... | २१८ |
| २५) | प्राणाचार्य विघंट | ............... | २२६ |
| २६) | मुदत संपली | ............... | २३७ |
| २७) | निकुंभ आणि दंतुर यांची भेट | ............... | २४३ |
| २८) | चर्चा–चोरदरवाजा | ............... | २५९ |
| २९) | बातमीदार | ............... | २७१ |
| ३०) | जुनी ओळख | ............... | २७७ |
| ३१) | हा राजा– की– तो राजा | ............... | २८९ |
| ३२) | दुरासद जालंधरायण | ............... | २९७ |
| ३३) | आणखी काही बातमी | ............... | ३०७ |
| ३४) | विनतेचे पूर्ववृत्त | ............... | ३१८ |
| ३५) | राजाने केलेली व्यवस्था | ............... | ३३८ |
| ३६) | विघंटाची समजूत | ............... | ३४४ |
| ३७) | रोचमान जालंधरायण | ............... | ३५० |
| ३८) | चंदनदासाची पेढी | ............... | ३५९ |
| ३९) | रोचमान जालंधरायण | ............... | ३७१ |
| ४०) | पुनरागमन | ............... | ३७७ |
| ४१) | 'चिंता परा... ते येई घरा' | ............... | ३८४ |
| ४२) | स्वप्न | ............... | ३९७ |
| ४३) | भामिनीची हकिकत | ............... | ४०६ |
| ४४) | शाप | ............... | ४१५ |
| ४५) | वासंती आणि रोचमान | ............... | ४२० |
| ४६) | अंत्यसंकेत | ............... | ४२५ |
| ४७) | शापविमोचन– कथा समाप्ती | ............... | ४२८ |


✦✦✦